उन्नती संस्थेदवारा प्रसारित ...

उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

**पत्र ११, महिना – जानेवारी २०१८**

# बिडे वार्तापत्र

**बिडे (कोरकू) = उठा (मराठी)**

**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**

====================================

## एका खाजगी शिकवणी वर्गातील शिकवण्याची गोष्ट

लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा! असं देवाकडे मागायला किती छान वाटेल नाही का? लहानपणीचे दिवस आठवले की असं वाटतं परत यावेत ते दिवस. पण आताच काही दिवसांपूर्वी म्हणजे डिसेंबर २०१७ या महिन्यातील दुसऱ्या आठवड्यात आलेल्या अनुभवामुळे आता तर वाटतंय असं बालपण नको बाबा.

एका शिकवणीच्या वर्गावर चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याकरिता एका शिकवणी वर्गाच्या संचालिका बाईंनी (पूर्वी एका नामांकित इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका) विचारले व माझी आवड म्हणून मी लगेचच होकार दिला. शिकवणीचा पहिला दिवस वेळ दुपारी ३.३० ते ५, पहिली तुकडी, यामध्ये अनुक्रमे ३ री, ४ थी आणि ५ वी इंग्रजी (कॉन्वेंट) शाळेमधील प्रत्येकी २ विद्यार्थी एकत्रित व मी त्यांना शिकवावे ही अपेक्षा. प्रथम तर मला प्रश्नच पडला की वेगवेगळ्या वर्गातील मुलांना मी एकत्रित कसं शिकवणार? संचालिका बाईंना मी तसे विचारले. त्यांनी मला त्यांची शिकवण्याची अपेक्षित पद्धत सांगितली त्याप्रमाणे मला मुलांना काही शिकवायचं नव्हतंच! मला फक्त त्या मुलांना दिवाळीनंतरचा जो अभ्यासक्रम आहे, कुणाचे ४ तर कुणाचे ५ पाठ शाळेत शिकून झालेले आहेत, त्या पाठामधील छोटे-मोठे प्रश्न, रिकाम्या जागा व जोड्या लावा, हे प्रश्न मुलांकडून परीक्षेला येतील म्हणून पाठ करून घ्यायचे होते.. आणि एकदा त्यांच्या वह्यांमध्ये मुलांकडून त्यांनी न पाहता उत्तरे लिहून घ्यायची होती.. हे करून घेण्याकरिता मी मुलांना बोलावं, रागवावं, मारावं असं काहीही केलं तरी चालेल पण मुलांना पाठ झालं पाहिजे हे महत्वाचं...

मग संचालिका बाईंना विचारले की "मुलांकडून पाठ करून घेणे योग्य वाटत नाही, त्यापेक्षा पाठातील काही अडचण, न समजलेले भाग शिकवावा का ?" तर त्यांनी सांगितले की "हे सर्व शाळेत झालेलं आहे. म्हणून मुलांना शिकवण्याऐवजी मुलांचा अभ्यास पाठ करून घ्यायचा आहे, तेही धमकावून, मारून केला तरी चालेल."

शिकवणीच्या वर्गातील वातावरणाविषयी सांगते, संचालिका यांच्या घरातच वर्ग चालतात, घराच्या समोरची व बाजूची अशा २ खोल्यांमध्ये हे वर्ग चालतात. एका खोलीमध्ये त्या स्वत: शिकवत होत्या, तर दुसऱ्या खोलीत मी व माझ्या सोबत एक बाई अशा दोघीजणी खोलीच्या मध्ये एक पडदा टाकून २ वर्ग घेत होतो. या खोल्या १० x १० फूट एवढ्या लांबी व रुंदीच्या आहेत. यात शिक्षकांचे आवाज, मुलांचे आवाज... इतका गोंधळ की माझ्याच डोक्यात गोंधळ व्हायला लागला, तर मुलांचं अभ्यासात मन लागायचा प्रश्नच येत नाही.

माझ्यासमोर इयत्ता दुसरीच्या मुलांची शिकवणी घेणाऱ्या एक शिक्षिका मुलांकडून साधी spelling mistake झाली म्हणून मुलांना मारून, बोल लावून चुका सुधारण्यास सांगत होत्या. मुलांच्या निरागसतेचा, बौद्धिक क्षमतेचा कोणताही विचार न करता... मी मुलांना सांगितले की "मी तुम्हाला मारणार नाही, तुम्हाला काय येत नाही आपण पाहू या" पण मुले इतकी घाबरलेली होती की एक शब्द बोलायला तयार होईना.

मला अजून एक धक्का तर तेव्हा बसला, जेव्हा एका

मुलाची आई मुलाला घेऊन सोबत आली होती. तिची तक्रार होती "शिकवलेलं मुलाच्या लक्षात राहत नाही, अभ्यास करत नाही, खेळत राहतो, घरात थांबत नाही, बाहेरच असतो...." संचालिकेकडेच मुलाचे दोष सांगत होती. म्हणजे जाब विचारावा, तर उलट मुलाच्या तक्रारी आई करताना दिसली. म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी. मग संचालिका बाई म्हणू लागल्या "आम्ही तर मुलांकडून सर्व करून घेतो, पोरंच लक्षात ठेवत नाहीत." सांगा मुलांनी काय करावं?? **मुकी बिचारी कुणीही हाका.**

हे सर्व पाहताना, असं वाटत होत की पालक असे कसे वागतात? शाळेत पैसा, शिकवणी वर्गासाठी पैसा दिला की झाली आपली जबाबदारी.. पैशांनी सर्व होईल असं त्यांना वाटत का? इंग्रजी शाळा, त्यांचे शिकवणी वर्ग आणि यामध्ये टाकून मुलांना फक्त अभ्यास एके अभ्यासाचा ताण देऊन त्याचं बालपण व अतिशय महत्वाचे जडणघडणीचे दिवस आपण हिरावतो आहोत हे कसं त्यांना कळत नाही? त्यांच्या क्षमता वाढीसाठी मुलांना पूरक वातावरण कसं द्यावं, याकरिता खरे तर पालकांचे प्रबोधन होण गरजेच आहे.

तो क्लास मी दोन दिवसात सोडला. पण सारखे त्या मुलांचे घाबरलेले चेहरे मला दिसत आहेत. हे चित्र पाहून मी तर माझ्या मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत कधीही टाकणार नाही आणि शिकवणी न लावता त्याचा घरीच अभ्यास करून घेईन हे पक्के केले. पण तरी याकरिता आपल्याला अजून काय करता येईल हा मोठा प्रश्न मला पडलाय. या ट्युशन क्लासच्या वर्तनाकडे सरकारचे असे कसे दुर्लक्ष?

टीप - संचालिका बाईंनी काही वर्षे एका नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून काम केलेलं आहे, त्यांना चांगलं इंग्रजी येतं म्हणून पालकांना वाटतं की बाई चांगल्या शिकवतील, आमच्या मुलांना सुद्धा चांगलं येणार, म्हणून अकोट मध्ये सर्वात जास्त शुल्क या बाई घेतात.

- **प्रत्यक्ष अनुभव घेतलेली पालक, अकोट**

## बरं झालं एकदाच बांधकाम सुरु झाले!

ही गोष्ट आहे, एका धडपड करणाऱ्या शिक्षकाची. केलपानी खु. हे अमरावती जिल्ह्यातल्या चिखलदऱ्याच्या जंगलातून अकोट तालुक्यात स्थलांतरित झालेले गाव. अकोट आणि तेल्हारा तालुक्यांत अशी आठ गावे आहेत. शासनाने स्थलांतर करून दिले, पण पायाभूत सुविधांची अजून वानवाच आहे. केलपानी खु. येथे मुलांना शाळेची इमारत नाही, ती व्हावी, याकरिता भास्कर गुरुजी गेल्या दोन वर्षापसून प्रयत्न करीत आहेत.

सध्या शाळा एका घरात भरते. मी एकदा शाळा भेटीच्या दरम्यान तिथे गेलो तेव्हा शाळेत मुख्याध्यापक मुलांना शिकवीत होते, मधल्या सुट्टीत बोलताना सांगत होते, की मी शाळेची इमारत उभी राहावी, यासाठी प्रयत्न करीत आहे, पण खूप अडचणी येत आहेत. शासन म्हणते की स्थलांतरित गावाच्या शाळेसाठी तरतूद नाही म्हणून शाळा होऊ शकत नाही. मला शाळेसाठी निधी नको, तर फक्त जागेचा ८ अ (कागदपत्र) हवे आहे, आणि तो उपलब्ध नाही. अमरावती जिल्ह्यातील काही आदिवासी गावात पुण्यातील एका संस्थेने शाळा बांधकामासाठी मदत केली आहे, त्यांनी मदत करण्याचे मान्य केले पण त्यांना शाळेच्या जागेचे कागदपत्र लागणार होते. त्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे जाऊन आलो, तर ते म्हणतात शाळेसाठी जागाच नाही, म्हणून त्याचे कागदपत्र नाही. या सर्व अडचणी आल्या, तरी त्यांनी हार मानलेली नव्हती. मधल्या काळात लोकांनीही त्यांच्या हक्कासाठी संघर्ष सुरु केला त्यामुळे शाळेविषयी काही घडामोडी घडल्या त्या वाचा पुढच्या वार्तापत्रात....



**केलपाणी खु. ची शाळा याच घरात भरते.**

उन्नती संस्था, द्वारा, श्री. अरुण सोनोने, पूर्वा नगर, MSEB कार्यालयासमोर, अडगाव बु. ता. तेल्हारा, जि. अकोला पिन - ४४४१२६. Email – unnati.akot@gmail.com (m – 8605599828)